INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.625 E-ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

April 2021

Special Issue 265




**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID No. PU/AN/A/58/1999

PRINCIPAL
SAVITRIBAI COLLEGE OF ARTS
Pimpalgaon Pisa, Tal.Shrigonda,
Dist.Ahmednagar

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

E-ISSN : 2348-7143
April- 2021

**Impact Factor – 6.625** **E-ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

**PEER REFEREED & INDEXED JOURNAL**

**April-2021**

**Special Issue 265**

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo (Source) : Internet – NASA's Perseverance Rover successfully touched down on Mars on Thursday, 18th February 2021.**

**© All rights reserved with the authors & publisher** **Price : Rs. 1000/-**



ID. No. PU/AN/A/ 58/1999
Savitribai College of Arts Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S. -** Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva -** Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju –** Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh-** King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre -** Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar -** BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar -** Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik -** Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh -** Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath-** Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi -** Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali -** Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar -** Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur -** Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman -** Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde -** Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare -** Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile -** BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar–** BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare –** Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar –** M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258



Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar · ID. No. PU/AN/A/ 58/1999
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

| | | | |
|---|---|---|---|
| 56 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास | डॉ. संजय पाटील | 303 |
| 57 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान | डॉ. लता आंदे | 309 |
| 58 | पुणे करार गांधी-आंबेडकरांची भूमिका | प्रा. दत्ता बडुरे, प्रा. बापूसाहेब जवळेकर | 315 |
| 59 | महाडचा सत्याग्रह आणि पांडुरंग नथुजी राजभोग | डॉ. राजकुमार सुरवसे | 325 |
| 60 | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे शैक्षणिक विचार | डॉ.राजेंद्र रासकर | 328 |
| 61 | मौलाना अबुल कलाम आजादांचा आधुनिक भारताविषयीचा दृष्टीकोन | फैयाज अ.रऊफ इनामदार | 332 |
| 62 | १९७८ ते २०१९ या कालखंडातील कारंजा विधानसभा मतदारसंघातील निवडणूक राजकारणाचा अभ्यास | प्रा.ए.पी.वनारसे | 337 |
| 63 | भारतीय कृषी वित्तपुरवठ्यात राष्ट्रीयकृत बँकांची भूमिका | श्यामराव वासनीकर | 346 |
| 64 | काजू बोंडापासून तयार होणाऱ्या पदार्थांचे विपणन | दिपाली नलावडे, डॉ.एस.के.ढगे | 351 |
| 65 | कोरोना काळ आणि ग्रंथोपचार : एक अभ्यास | हितेश ब्रिजवासी, पंकज देशमुख | 355 |
| 66 | आदिवासी विद्यार्थ्यांना गणित विषयाच्या अध्ययनात साहित्य हाताळतांना येणाऱ्या अडचणी शोधून केलेल्या उपाययोजनांचा संपादणुकीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास | प्रा.सौ.व्ही.व्ही.बाविस्कर | 360 |
| 67 | कोकणातील काजूला भौगोलिक मानांकनाची गरज | दिपाली नलावडे, डॉ. एस. के. ढगे | 365 |
| 68 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य | डॉ. लता आंदे | 369 |
| 69 | कारुण्याचा हळवा स्वर 'रमाई'-डॉ.युवराज सोनटक्के यांच्या गंभीर भावानुवादाची लक्षणीय निर्मिती | प्रा.डॉ.सुरेश खोब्रागडे | 373 |
| 70 | ڈاکٹر اقبال کی شاعری کے تہذیبی عناصر | Syed Asfiya Madni Zakriya | 379 |
| 71 | ہندوستانی تہذیب اور اردو ڈرامہ | Rasheedunnisa Yousuf & Dr. Asfiya Madni Zakariya | 383 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

# काजू बोंडापासून तयार होणाऱ्या पदार्थांचे विपणन

**नलावडे दिपाली बबनराव**
संशोधक विद्यार्थीनी
बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे २७;
मोबाईल नं. 9970339640

**प्राचार्य डॉ.एस.के.ढगे**
कुकडी एज्यूकेशन सोसायटीचे सावित्रीबाई कला महाविद्यालय
पिपळगाव पिसा,ता.श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

**गोषवारा**

आज बाजारात काजूने सर्वत्र सुकामेवा म्हणून मानाचे स्थान मिळवलेले आहे. तसेच काजूगराच्या विविध पदार्थांना बाजारात सातत्याने मागणी वाढत आहे. काजू बी व काजू बोंडावर प्रक्रिया करून त्यांचे प्रक्रियायुक्त पदार्थांचे मार्केटिंग केले तर शेतकऱ्यांना त्याचा मोठया प्रमाणात आर्थिक लाभ मिळेल. विविध कृषी विद्यापीठांनी काजू बोंडाच्या प्रक्रियायुक्त पदार्थांचे, काजू टरफलापासून सौर उर्जेवर घरगुती पद्धतीने तेल तयार करण्याचे संशोधन केले आहे. विविध उपयोगी काजू बी व काजू बोंडाच्या पदार्थांचे मार्केटिंग करणे काळाची गरज आहे जे की, आज समाजापर्यंत पोहचलेले नाही.

**कळीचे शब्द** – उत्पादन, काजूगर, काजू बोंड, काजू बी, काजूचे मार्केटिंग, काजू टरफल

**प्रस्तावना:**

कच्च्या काजूवर प्रक्रिया करून काजूचे विपणन वेगवेगळया पद्धतीने करणे ही काळाची गरज बनली आहे. ग्राहकाला काय हवे आहे? ग्राहकाची आवड निवड कोणती ? हयाचा काळाच्या ओघात होणारा बदल करणे गरजेचे आहे. हयासाठी विपणन पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. उत्पादित मालाची विक्री करून अधिकाधिक नफा मिळविणे हा त्या उद्योजकाचा महत्वाचा उद्येश असतो. फळ प्रक्रिया उद्योगात हंगामानुसार त्या फळावर प्रक्रिया करून पुढे वर्षभर त्या पदार्थांची विक्री करावी लागते म्हणजेच मार्केटिंग हा महत्वाचा भाग आहे. काजू उद्योजकाने आपला माल प्रक्रिया करून स्वत: घाऊक व्यापारी, किरकोळ विक्रेत्यास जसे की शॉपिंग मॉल्स, मोठे दुकानदार, मोठे हॉटेल्स, मोठया बाजारपेठा इत्यादी अनेक ठिकाणी विक्री केल्यास काजू उत्पादकास मोठया प्रमाणात फायदा होतो. परंतु जाहिरात मात्र स्वत: करावी. प्रक्रिया केलेल्या काजूची किंवा काजूच्या पदार्थांचे मार्केटिंग करताना प्रथम आपल्या पदार्थांची मागणी निर्माण करावी. आपला माल इतरांपेक्षा किती चांगल्या प्रतीचा आहे. कमीत कमी किंमतीत ग्राहकाला अधिक समाधान कशा पद्धतीने मिळेल अशा पद्धतीने जाहिरात करणे गरजेचे आहे.

**व्यापारीदृष्टया** काजू पिकाची लागवड भारत, मोझांबिक, टांझानिया, व्हिएतनाम, आयव्हरी कॉस्ट, ब्राझील इत्यादी अनेक देशामध्ये केली जाते. भारतात काजूचे उत्पादन फार मोठया प्रमाणात घेतले जाते. तर भारतात महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडू, कर्नाटक इत्यादी अनेक राज्यात प्रामुख्याने काजूचे उत्पादन घेतले जाते. १९९० पासून महाराष्ट्र शासनाने रोजगार हमी योजनेतून फळझाड लागवड ही महत्वाकांक्षी योजना सुरू केली व या योजनेत काजूची कलमे लावणे बंधनकारक केले. तसेच वेंगुर्ला प्रादेशिक फळ संशोधन केंद्राची स्थापना झाल्याने काजूच्या अधिक अधिक उत्पादन देणाऱ्या विविध जाती विकसित केल्या. महारा ट्रात काजू लागवडीखालील क्षेत्रात लक्षणिय वाढ झाली. मुख्यत्व: सिंधूदुर्ग, रत्नागिरी, रायगड, कोल्हापूर,ठाणे इत्यादी



Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID. No. PU/AN/A/ 58/1999
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

**उद्दिश्टे –**

१. कोकणातील काजू बोंडापासूनच्या तयार पदार्थाचे विपणन करणे.

२. भारतातील काजू निर्यात व आयातीचा अभ्यास करणे

**अभ्यास पद्धती –**

प्रस्तुत अभ्यासात दुय्यम सामग्रीच्या साहाय्याने माहिती संकलित केली आसून संदर्भ पुस्तके व लेख इंटरनेटचा वापर केला आहे.

**१.काजूचे प्रक्रिया युक्त पदार्थ**

आज काजूगराने सर्वत्र पौश्टिक सुकामेवा म्हणून मानाचे स्थान मिळविले आहे. काजू बीवर प्रक्रिया करून काजूगर मिळविला जातो. काजू बी व काजू बोंडावर प्रक्रिया करून प्रक्रियायुक्त पदार्थ बाजारपेठेत विकले तर यातून शेतकऱ्यांना याचा नक्कीच आर्थिक लाभ होऊ शकतो. काजूगराचे विविध प्रक्रियायुक्त पदार्थ त्यामध्ये चिक्की, लाडू, बर्फी,सरबत व जॅम यांना बाजारात सातत्याने मागणी वाढत आहे. काजूचे फळ ज्याला बोंड म्हणून ओळखले जाते. ज्या मध्ये'क' जीवनसत्त्वे मोठया प्रमाणात असतात. या जीवनसत्वांमुळेच सिंधुदूर्ग जिल्हयातील वेंगुर्ल्याच्या काजूस जी आय मानांकन मिळाल्याचे दिसून येते. काजू बोंडापासून सरबत, स्क्वॅश, सिरप, चटणी, जॅम, कॅडी, लोणचे, काजू टरफलापासून तेल यासारखे टिकाऊ पदार्थ तसेच काजू बोंडाचा उपयोग गोवा राज्यातील फेणी नावाचे मादक पेय करण्यासाठी मोठया प्रमाणात केला जातो.

काजूच्या टरफलापासून तेल मिळते त्याचा उपयोग लॅमिनेटिंग कागद, अॅक्टिवेटेड कार्बन, ब्रेक लाईनिंग, रंग व रेझिन इत्यादी उद्योगात केला जातो. काजूच्या झाडाची सालीपासून ९ टक्के टॅनिन तसेच तांबुस व पिवळसर रंगाचा डिंक मिळतो. या डिंकाचा उपयोग पुस्तक बांधणी, जखमा, घट्टे यावर केला जातो. काजूच्या झाडाचा उपयोग होडया तयार करण्यासाठी होतो.

**२.काजू बोंडापासून टिकाऊ पदार्थ**

काजू बियांच्या जवळ जवळ ४ ते ५ पटीने काजू बोंडाचे उत्पादन होते. परंतु कोकणात उत्पादनाच्या सुमारे 90 ते 95 टक्के काजू बोंडे वाया जातात. काजू बोंडामध्ये १० टक्के शर्करा असून 'क' जीवनसत्त्वांचे प्रमाण सुमारे 262 मिलीग्रॅम आहे. तसेच काजू बोंडाची आम्लता 0.22 टक्के असून काजूबोंड पाचक आहे. कृषी विद्यापीठाने काजू बोंडापासून विविध प्रकारची पेये तसेच जॅम करण्याच्या पद्धती विकसीत केल्या. काजू बोंडापासूनचे सिरप व स्क्वॅश मध्ये असलेल्या मात्रा तक्ता 1.1 मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता १.1: काजू बोंडापासूनचे सिरप व स्क्वॅशमधीला मात्रा**

| अ.नं. | घटक | स्क्वॅश ;ग्रॅ.) | सिरप ;ग्रॅ.) |
|---|---|---|---|
| १ | काजू बोंडाचा रस | 250 | 500 |
| २ | सयट्रिक आम्ल | 7.5 | 14 |
| ३ | एकूण विद्राव्य घटक;साखरद्ध | 425 | 1000 |
| ४ | पाणी | 317.5 | & |

स्त्रोत: कृषी पणन मित्र मासिक,एप्रिल २०१५ पान,११

तक्ता १॰१ मध्ये कजू बोंडापासूनचे सिरप व स्क्वॅश मधील आवश्यक मात्रा दर्शविलेल्या आहेत काजूबोडाचा रस सिरपमध्ये ५०० ग्रॅ. असून स्क्वॅश मध्ये तो २५०ग्रॅ. असल्याचे दिसून येतो. काजूबोंड अतिशय उपयुक्त आहे की, जे काजू उत्पादक तकऱ्यांकडून मोठया प्रमाणात वाया जात असल्याचे दिसून येते.



Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar ID. No. PU/AN/A/ 58/1999
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue - 265 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April- 2021

**काजूगर व काजू टरफल तेल निर्यात व काजू बी देशातील आयात**

भारत हा कच्च्या काजूची आयात व काजूगराची निर्यात करणारा जगातील प्रमुख देश आहे. आज भारत जगातील ६५ पेक्षा अधिक देशांमध्ये काजू गराची निर्यात करत आहे. भारत जगातील टांझानिया, गुनियाबसू, आयवरी कॉस्ट, इंडोनेशिया, बेनिन, मोंझाबिक, केनिया, नायझेरिया व सिंगापूर इत्यादी देशांमधून काजू बीची आयात केली जाते. काजूगराचा सर्वात मोठा ग्राहक म्हणून अमेरिका या देशाचा उल्लेख केला जातो.त्यानंतर नेदरलॅंड, इंग्लड व जपान इत्यादी देशांचा क्रम लागतो. भारतातून काजूगर व काजू टरफल तेलची निर्यात व काजू बीची देशातील आयात तक्ता १०२ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता १.2: भारतातून काजूगर, काजू टरफल तेल निर्यात व काजू बीची आयात**

| व f | काजूगर | | टरफल तेल | | काजू बी आयात | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पादन (मे.टन) | किंमत (करोड) | उत्पादन (मे.टन) | किंमत (करोड) | उत्पादन (मे.टन) | किंमत (करोड) |
| 2011-12 | 131760 | 4290.68 | 13575 | 59.46 | 809371 | 5337.76 |
| 2012-13 | 104015 | 4067.21 | 9192 | 29.84 | 892160 | 533112 |
| 2013-14 | 114791 | 5058.73 | 9480 | 38.61 | 771356 | 456399 |
| 2014-15 | 118952 | 5432.85 | 1093.80 | 55.81 | 939912 | 657093 |
| 2015-16 | 96,346 | 4,952.12 | 11,677 | 57.59 | 9,58,339 | 8,561.01 |
| 2016-17 | 82,302 | 5,168.78 | 11,422 | 44.70 | 7,70,446 | 8,839.42 |
| 2017-18 | 84,353 | 5,870.97 | 8325 | 32.63 | 649050 | 8850.03 |
| 2018-19 | 66693 | 4433.99 | 5300 | 26.85 | 835463 | 10929.00 |
| 2019-20 | 67647 | 3867.16 | 4605 | 23.03 | 938038 | 8861.58 |

स्त्रोत:कु ी पणन मित्र 2017, CEPCI and DGCI &S, Kolkatta (Govt.of India Ministry of agri. and farmer welfare)

तक्ता 1.2 मध्ये देशातील काजूगर व काजू टरफल तेल निर्यात व काजू बी देशातील आयात दर्शविण्यात आली आहे. भारतात काजूगराची निर्यात 2017-18 मध्ये 84353 मे.टन झाली असून त्यापासून आपल्या देशास 5870.97 करोड रूपयांचे उत्पन्न मिळाले. तर टरफल तेलाची निर्यातीतून 32.63 करोड रूपयांचे उत्पन्न मिळाले आहे. तर 2019-20 मध्ये 67647 मे.टन झाली असून त्यापासून आपल्या देशास 3867.16 करोड रूपयांचे उत्पन्न मिळाले. काजू प्रक्रिया उद्योगांसाठी आवश्यक असलेला कच्च्या काजू बीची आयात करावी लागते व ती यावर्षी 938038 मे.टन एवढी करावी लागली. काजू बी ची आयात ही प्रक्रिया उद्योगांना लागणारा कच्चा माल यासाठी करावी लागत असल्याचे दिसून येते.

**काजू मार्केटिंगच्या वेगवेगळया पद्धती**

काजू प्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक असणारा कच्चा माल म्हणजे काजू बीची आयात करावी लागते. काजू बाजारात मार्केटिंगसाठी विविध मार्गाचा अवलंब केला तर काजू उत्पादक ोतकऱ्यांना त्याचा आर्थिक लाभ होईल

1. **उत्पादनावर आधारीत मार्केटिंग:** बाजारात मालाची कमतरता असेल त्या वेळे मार्केटिंग करणे
2. **विक्रीवर आधारीत मार्केटिंग:** मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या काजू मधून कोकणातील काजूची उत्तम प्रत, गुणवत्ता, वाजवी दर, सुरक्षित, पॅकेजिंग व पौष्टिक मूल्य इत्यादी बाबी संबंधी जाहिरात करणे.
3. **पारंपारिक मार्केटिंग:** वर्तमानपत्रे जाहिरात, मासिके, इत्यादीच्या मदतीने जाहिरात करणे



Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/58/1999 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

4. **डिजिटल मार्केटिंग**: मार्केटिंगचा हा सर्वात चांगला पर्याय आहे. इलेक्ट्रॉनिक मिडिया आणि इंटरनेट या माध्यमातून काजूची विक्री करणे. सर्च इजिन ऑप्टिमायसेन, सर्च इंजिन मार्केटिंग, सोशल मिडीया मार्केटिंग, डिस्ले मार्केटिक,ईमेल मार्केटिग, व्हिडिओ मार्केटिंग आणि मोबाईल मार्केटिंग. डिजिटल मार्केटिंग ही काळाजी गरज आहे. प्रत्येक व्यवसायात सर्वाधिक नफा मिळविण्यासाठी अशा प्रकारे पदार्थांचे मार्केटिंग केले पाहिजे.
5. **एपेडा**: कृषी व प्रक्रियाकृत अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण जागतिक बाजारपेठेतील एकूण कृ ी उत्पादनांच्या निर्यातील चालना देण्यासाठी नोदणीकृत पात्र निर्यातदारांना आर्थिक साहाय्य देण्यासाठी विविध योजना आहेत.
6. **विविध केता—विकेता मेळावा**, उत्पादनांची जाहिरात, शिष्टमंडळांची देवाणघेवाण, आंतररा ट्रीय व्यापार मेळावा, प्रदर्शन कार्यक्रम इत्यादीद्वारे परदेशी बाजारातही काजूची सुलभ करता येते.

**सारांश**:

आज बाजारात काजूने सर्वत्र सुकामेवा म्हणून मानाचे स्थान मिळवलेले आहे. काजूगराच्या विविध पदार्थांना बाजारात सातत्याने मागणी वाढत आहे. काजू बी व काजू बोंडावर प्रक्रिया करून त्यांचे प्रक्रियायुक्त पदार्थांचे मार्केटिंग केले तर शेतकऱ्यांना त्याचा मोठया प्रमाणात आर्थिक लाभ मिळेल. काजू बोंडाच्या प्रक्रियायुक्त पदार्थांचे संशोधन, काजू टरफलापासून सौर उर्जेवर घरगुती पद्धतीने तेल तयार करण्याचे संशोधन केले आहे. कोकणातील काजू बोंडाच्या प्रक्रियायुक्त पदार्थाचे मार्केटिंग मोठया प्रमाणात झाले तर चांगला दर मिळून. भारतातून काजूगर, काजू टरफल तेल निर्यात केल्यास देशास परकिय चलन मिळेल व काजूबी आयात केले तर काजू व्यावसायिकांच्या समस्या सुटतील. काजू बोंडात 'क'जीवनसत्व मोठया प्रमाणात असतात तसेच ते विविधोपयोगी आहे. काजू बोंडापासून काजू उत्पादक ोतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. विविध उपयोगी काजू बी व काजू बोंडाच्या पदार्थांचे विपणन करणे काळाची गरज आहे.

**संदर्भ** :


१ ढगे एस.के व हासे सी.पी-(2015) संशोधन पद्धती, के.एस्. पब्लीकेशन, पुणे 30
२ काजू प्रक्रिया : कृषी पणन मित्र. 2016 पान नं. 9.
३ काजू निर्यात : कृषी पणन मित्र. 2015 पान नं 32.
४ काजू फळविकास वृत्त.
५ चौगुले डी-,-(2007) महाराष्ट्रतील औषधी वनस्पतींचे उत्पादन व विपणन
६ महाराष्ट्र शासन सांख्यिकिय विभाग, कृषी विभागद्ध पुणे.— 411 005
७ कृषी पणन मित्र 2017, पान नं 33
८ CEPCI and DGCI &S, Kolkata (Govt. of India Ministry of agri. and farmer welfare)


Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar — ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
SAVITRIBAI COLLEGE OF ARTS
Pimpalgaon Pisa, Tal.Shrigonda,
Dist.Ahmednagar